|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

KBCNMU/11/PET24/Paper 3 Mark/Online/9943 /2025 दि : 14.11.2025

प्रति,

## PET-2024 मधील संशोधक विद्यार्थ्यांची नोंदणी असलेले संबंधित मार्गदर्शक यांचे करिता परिपत्रक

**विषय :** PET-2024 मध्ये तात्पुरत्या प्रवेशित संशोधक विद्यार्थ्यांचे पेपर-3 चे मार्क सादर करणेबाबत

**संदर्भ :** अधिसुचना क्र. KBCNMU/11/Researc/Course Work Exam/1110/2025 दिनांक 16/10/ 2025

महोदय,

आपणास विदितच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या प्री.पीएच.डी. कोर्स वर्क पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्री.पीएच.डी. कोर्स वर्क च्या पेपर-1 व पेपर-2 ची परीक्षा यापुर्वी जाहीर केलेल्या तारखेनुसार दि. 18/12/2025 रोजी आयोजित करण्यात येत आहे.

सबब संदर्भिय अधिसुचनेत नमुद केल्याप्रमाणे आपल्या मार्गदर्शनाखाली पेट-2024 च्या ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे, व ज्यांनी प्री-पीएच.डी. कोर्स वर्क पुर्ण करुन ज्यांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे अश्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पेपर-3 (PHD-003) : Guide s Course Based on Research Area चे मार्क आपल्या OAASIS Portal च्या PET-2024 च्या Login मधुन दि.10/12/2025 पर्यंत भरावयाचे आहे व आपल्या Log in मध्ये Annexure-II उपलब्ध असुन त्याची Print काढुन त्यातील माहिती भरुन त्यावर मार्गदर्शक व मा. प्राचार्य यांची स्वाक्षरी घेवुन ते Upload अरावयाचे आहे. एकदा ऑनलाईन Pepar-III चे मार्कस Upload केल्यावर कुठल्याही परिस्थितीत बदल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार नाही. सदरची माहिती भरण्यापुर्वी आपली माहिती भरावयाची आहे. (सदर Annexure II विद्यापीठात पाठवु नये)

आपली माहिती भरतांना OASSIS च्या पोर्टल वरुन PET-2024 च्या Login मधुन किंवा (https://phd.onlinekbcnmu.org.in/pet2024/index.php) ही Link वापरुन दिलेल्या सुचनांचे (Note मध्ये) पालन करुन आपली माहिती अद्यावत करुन घ्यावी. (Login व Password आठवत नसल्यास Forgot Passward-Ph.D. Guide हा पयार्य वापरावा.) तसेच Ph.D. Student Details या रकान्यात PET-2024 च्या विद्यार्थ्यांची माहिती भरतांना Registration Date रकान्यात विद्यार्थ्यांची Provisional Date of Registration ची तारीख भरावी. व या पुर्वी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती मधुन ज्या विद्यार्थ्याने किमान Final Thesis जमा केला आहे त्या विद्यार्थ्यांचे नाव Delete हा पर्याय वापरुन रद्द करावे.

जे मार्गदर्शक OAASIS च्या Portal वरुन संशोधक विद्यार्थ्यांचे पेपर-3 चे मार्क सादर करणार नाहीत त्यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांचा Pre-Ph.D. course work परीक्षेचा निकाल जाहीर होणार नाही. व त्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट होणार नाही, व यास संबंधित मार्गदर्शक जबाबदार राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

(पेपर-3 संदर्भातील Report of Seminar व review article हे मुळ दस्तएवज आपल्या संशोधन केंद्रात जतन करुन ठवावे विद्यापीठात पाठवू नये व विद्यापीठाकडुन ज्यावेळेस मागणी करण्यात येईल त्या वेळेस ते उपलब्ध करुन देण्यात यावे)

**टिप :- PET-2023 व PET-2021 मधील जया विद्यार्थ्यांनी कोर्सवर्क पूर्ण केला व ते जे कोसवर्क परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्यांचे देखील पेपर - 3 चे गुण Online भरावेत.**

आदेशान्वये

सहा.कुलसचिव (अ.का) 14/11

संशोधन